शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पोप्रमा-०२१८/ प्र.क्र.९४/ पोल-७, दिनांक १७.०५.२०१८, हा रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. पोप्रमा-०२१८/ प्र.क्र.९४/ पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ८ जुलै २०१९.

वाचा :-
1) शासन निर्णय, गृह विभाग, क्र सीआरपी-११०७/ २३३५/ प्र.क्र.५५५/ पोल-७, दिनांक १३.०२.२००९.
2) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पोप्रमा-०२१८/ प्र.क्र.९४/ पोल-७, दिनांक १७.०५.२०१८.
3) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी/ नागोठाणे-प्र.इमा./ रायगड/ ३५२/ २०१७, दिनांक १५.०६.२०१९.

प्रस्तावना.

पोलीस अधीक्षक, रायगड, यांच्या आस्थापनेवरील पोलीस ठाणे, नागोठाणे, तालुका-रोहा, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी शा.नि., गृह विभाग, क्र सीआरपी-११०७/ २३३५/ प्र.क्र.५५५/ पोल-७, दिनांक १३.०२.२००९, व्दारे रु.५०,७१,२२५/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. उक्त कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन पाच वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला असल्याने *(उक्त कामास अजून सुरुवात झाली नाही असे गृहीत धरुन)* महाराष्ट्र सा.बां. नियम पुस्तिका यामधील परिच्छेद २६२ अनुसार, शा.नि., गृह विभाग, क्र. पोप्रमा-०२१८/ प्र.क्र.९४/ पोल-७, दिनांक १७.०५.२०१८, द्वारे उक्त प्रशासकीय मान्यता आदेश म्हणजे शा.नि., गृह विभाग, क्र सीआरपी-११०७/ २३३५/ प्र.क्र.५५५/ पोल-७, दिनांक १३.०२.२००९, हा रद्द करण्यात आला होता.

२. तथापि, उक्त कामाकरिता एकूण रु.५०,७२,०००/- इतका निधी सा.बां. विभाग, महाड, यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून डिसेंबर २०१७ पासून काम सुरू झाले आहे व ते ६० टक्के पूर्ण झाले आहे, असे पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाच्या दिनांक १५.०६.२०१९ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे आणि उक्त शा.नि., गृह विभाग, दिनांक १३.०२.२००९, यास पुन:स्थापित करण्याची विनंती करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शासन पुढील निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय</u>.

शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पोप्रमा-०२१८/ प्र.क्र.९४/ पोल-७, दिनांक १७.०५.२०१८, हा याद्वारे रद्द करण्यात येत असून शा.नि., गृह विभाग, क्र. सीआरपी-११०७/ २३३५/ प्र.क्र.५५५/ पोल-७, दिनांक १३.०२.२००९, यास यथापूर्व करण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७०८१२४६४५७१२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL
GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.07.08 12:52:01 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.
३) पोलीस अधीक्षक, रायगड, मुक्काम-अलीबाग.

प्रत-

१) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, महाड, जिल्हा-रायगड.
२) जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).